## ८ डिसेंबरपासून नागपूर हॉटस्पॉट
### हिवाळी अधिवेशनात ३३ मोर्च्यांची धडक

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरू होत असून, उपराजधानीत राजकीय तापमान प्रचंड वाढले आहे. अधिवेशनाचा कालावधी फक्त सात दिवसांचा असला तरी या सात दिवसांत संपूर्ण राज्याचे राजकारण हादरण्याची चिन्हे दिसत आहेत. रविभवनपासून सिव्हिल लाईन्सपर्यंत शासनव्यवस्था रेड अलर्ट मोडमध्ये गेली आहे. मंत्र्यांच्या निवासस्थानी डागडुजी, सजावट, हालचालींना वेग आला आहे. यंदाचे अधिवेशन वातावरण, मुद्दे आणि सुरक्षा तिन्ही स्तरांवर वादळी ठरण्याची शक्यता अधिकच गडद झाली आहे. नागपूरमध्ये ८ डिसेंबरपासून एकाच दिवशी पाच मोर्च्यांची विधानभवनावर धडक होणार आहे, तर संपूर्ण अधिवेशनात तब्बल ३३ मोर्चे, २२ धरणे आंदोलन, आणि १७ साखळी उपोषणे यासाठी परवानगी मागण्यात आली आहे. त्यामुळे सिव्हिल लाईन्स परिसर अक्षरशः पोलिस छावणीत बदलला आहे. राज्यभरातून तीन हजारांहून अधिक पोलिस दलाची फौज नागपूरमध्ये दाखल होत असून, आधुनिक दक्षता वाहने, बीडीडीएस पथक, विशेष कमांडो यांची तैनाती करण्यात आली आहे. शासकीय सुट्या असल्या तरी या वेळी अधिवेशनाचा वेग मंदावणार नाही. शनिवार-रविवारीही दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू राहणार आहे, असा निर्णय कामकाज सल्लागार समितीने घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता २१ डिसेंबरपर्यंत लागू असल्याने अधिवेशनाची मुदत मर्यादित ठेवण्यात आली आहे. पण या कमी कालावधीतही चर्चेची तापलेली ठिणगी अनेक मुद्द्यांना पेटवेल, अशी चिन्हे आहेत.

# शिक्षकांचे 'शाळा बंद' आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
टीईटी परीक्षेची सक्ती आणि 15 मार्च 2024 च्या संचमान्यतेच्या वादग्रस्त शासन निर्णयाविरोधात राज्यातील शिक्षकांनी आज राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात मुख्यत्वे खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. शिक्षक संघटनांच्या दाव्यानुसार, मुंबईतील 200 ते 300 तर राज्यभरातील जवळपास दीड हजार शाळा आज बंद राहतील, ज्यात विनाअनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचाही समावेश आहे. या आंदोलनाला शिक्षक भारती, मुंबई मुख्याध्यापक संघटना, संस्थाचालक संघटना तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना यांसारख्या विविध संघटनांनी पाठिंबा दर्शवला आहे.

टीईटी सक्तीमुळे शिक्षकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 53 वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या सर्व




शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती केली आहे. या निर्णयावर राज्य सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी आणि शिक्षकांची बाजू मांडावी, अशी प्रमुख मागणी संघटनांनी केली आहे. त्यासोबतच, शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत 15 मार्च 2024 च्या जीआरमधील अन्यायकारक निकष लावून हजारो शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्याची प्रक्रिया सुरू आहे. या समायोजनामुळे शाळांचे नियोजन पूर्णपणे कोलमडणार असल्याने, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला तातडीने स्थगिती देण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

#### ... तर १० डिसेंबरला आंदोलन

शिक्षक संघटनांसोबत नागपूर येथे झालेल्या बैठकीत शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून शासनाची भूमिका स्पष्ट करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्याबाबत शिक्षण विभागाने कोणतेही परिपत्रक न काढल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शिक्षण विभागाने टीईटी सक्ती आणि अन्यायकारक संचमान्यतेचा जीआर रद्द करण्याबाबत ठोस निर्णय न घेतल्यास, येत्या 10 डिसेंबरला नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान शिक्षक भारती संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनात सरसकट सर्व शिक्षकांसाठी असलेली टीईटी उत्तीर्ण होण्याची अट रद्द करणे, 15 मार्च 2024 चा अन्यायकारक शासननिर्णय रद्द करणे, 1 नोव्हेंबर 2005 नंतर नियुक्त सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, 10-20-30 वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे आणि शिक्षणसेवक पद रद्द करून शिक्षकांची कायमस्वरूपी नेमणूक करणे, यांसारख्या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

दरम्यान, शिक्षण विभागाने या आंदोलनाची गंभीर दखल घेतली आहे. शिक्षण संचालकांनी पत्र काढून कुठल्याही शाळा बंद राहणार नाहीत याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. याव्यतिरिक्त, जर शाळा बंद राहिल्यास त्या ठिकाणीच्या मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाचे वेतन कपात करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी व उपसंचालकांना देण्यात आले आहेत.

### मोबाईलवर बोलताना बिबट्याचा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ५ :**
रात्रीच्या अंधारात मोबाईलवर बोलणाऱ्या एका तरुणावर बिबट्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना पुण्याच्या जुन्नर तालुक्यात घडली आहे. या घटनेत सदर तरुण जखमी झाला असून, त्याच्यावर इस्पितळात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे तालुक्यातील बिबट्याचा वावर पुन्हा एकदा समोर आला असून, नागरिकांत दहशतीचे वातावरण पसरले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, तनिष नवनाथ परदेशी (18) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो रात्री 8.15 च्या सुमारास नारायणगाव - जुन्नर रस्त्यालगतच्या साकार नगरी सोसायटीलगत अंधारात मोबाईलवर बोलत उभा टाकला होता. तो मोबाईलवर बोलण्यात एवढा गुंग झाला होता, त्याला बिबट्या आपल्या जवळ आल्याचा कोणताही थांगपत्ता लागला नाही. अखेर तनिष मोबाईल बोलत असतानाच बिबट्याने त्याच्या अंगावर झेप घेतली. त्यात तनिष जबर जखमी झाला. बिबट्याने आपल्या नखाने त्याच्या अंगावर मोठमोठे ओरखडे ओढले. पण त्याने आरडाओरडा केल्यामुळे बिबट्या अंधारात पळून गेला. या घटनेत तनिषच्या पायाच्या पोटरीवर मोठी जखम झाली आहे.

### महायुती सरकारने एक वर्षाच्या कामाची श्वेतपत्रिका काढावी
## विजय वडेट्टीवार यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
महायुती सरकारला सत्तेत येऊन एक वर्ष आज पूर्ण झाले.या एक वर्षात सरकार आपलीच पाठ थोपटून घेत आहेत, पंचतारांकित हॉटेल मध्ये बसून सरकार आपली उपलब्धी सांगत असले तरी जनतेच्या पदरी मात्र निराशाच आली आहे, त्यामुळे या सरकारने अधिवेशनात आपल्या कामाची श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी येथे केली.



महायुती सरकार आल्यानंतर शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही.बियाणे खत मिळत नाही. मराठवाड्यात पूर आला यातून शेतकरी उध्वस्त झाला आहे. कुपोषित बालकांची संख्या वाढली.राज्यातील रस्त्यांची चाळण झाली आहे.महिलांवर अत्याचार वाढले आहे. बिल्डर आणि मंत्री संगनमताने राज्यातील कोट्यवधीच्या जमिनी बळकावल्या जात आहे.लाडक्या उद्योगपतींना लाभ मिळतो,पण सामान्य जनतेला मात्र संघर्ष करावा लागत आहे.म्हणून या सरकारने एक वर्षात केलेल्या कामाची श्वेतपत्रिका काढावी अशी थेट मागणीच वडेट्टीवार यांनी केली.

चंद्रपूर येथील बरांज कोळसा खाणीत पूर्णतःहा नियमांचे उल्लंघन करून अवैध कोळशाचे उत्तखंनन करण्यात येत आहे.हा लाखोंचा कोळसा खुल्या बाजारात विकला जात आहे. पर्यावरण विभागाने या खाणीला २०२३ ला मंजुरी देताना ज्या अटी व शर्ती घातल्या होत्या,त्यांचा भंग केला जात असून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अजूनही करण्यात आलेले नाही.पर्यावरण मंत्र्यांपासून ते वन अधिकारीही यात सहभागी आहेत.याविरोधात विधानसभेत आम्ही प्रश्न उपस्थित करणार असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला.

महायुती सरकार सत्तेत आले पण विधानसभा असो की विधानपरिषद या सभागृहात विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही.कारण हे सरकार लोकशाही आणि संविधानाला मानत नाही.लोकशाहीत विरोधी पक्ष महत्वाचा असतो.पण सरकारला विरोधक नको,विरोध नको म्हणून ही पद रिक्त ठेवण्यात आल्याची टीकाही वडेट्टीवार यांनी केली. नागपूर इथे हिवाळी अधिवेशनपेक्षा अर्थसंकल्पीय अधिवेशन घेतले पाहिजे,अशीही मागणी यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन 2026 मधील नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र.प्र. ओतारी यांनी कळविली आहे. प्रस्तावित वेळापत्रकानुसार सन 2026 मध्ये राज्य सेवा मुख्य परीक्षा-2025, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-2025, महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र गट- ब सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-, महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित परीक्षा-2026, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा-2026 व महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा-2026 इत्यादी परीक्षा होणार आहेत, असेही कळविण्यात आले आहे.

## शालार्थ आयडी प्रकरण
### एसआयटीला ३ महिन्यांची दिली मुदतवाढ



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यभरात सध्या शिक्षण क्षेत्रातील शालार्थ आयडी घोटाळा गाजतो आहे. यात अनेक मोठे अधिकारी चौकशीसाठी अटकेत आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती शोधण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली. या समितीला आता तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. कोल्हापूरमध्ये टीईटी पेपरफुटी प्रकरणी कडक कारवाई केली असून पुढील तपास सुरू असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले. शहरात आयडॉल शिक्षक कार्यशाळेचे आयोजन तापडिया नाट्यमंदिर येथे गुरुवार 4 डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या वेळी माध्यमांशी चर्चा करताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे व राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे. त्यांना तंत्रज्ञानाचे चांगले आणि वाईट परिणाम देखील शिकवणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिक्षकांनी शाळांमध्ये करावा. त्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येणार असल्याचेही भोयर यांनी यावेळी माहिती देताना सांगितले.

## महाराष्ट्रातील इतर पक्ष कसे चालतील हे देवाभाऊच ठरवतात


मंगलप्रभात लोढा यांचे विधान

**मुंबई :** महाराष्ट्रातील राजकारणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची असलेली पकड सर्वश्रूत आहे. त्यांनी आपल्या मुरब्बी राजकारणाच्या जोरावर आतापर्यंत विरोधी पक्षांना निष्प्रभ केल्याचा दावा केला जातो. त्याची प्रचिती मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या एका विधानातून आली आहे. भाजप देवाभाऊमय आहेच, पण राज्यातील इतर पक्ष कसे चालतील हे ही देवाभाऊच ठरवतात, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे. मुंबई भाजपचा एक मेळावा शुक्रवारी मुंबईत पार पडला. त्यात बोलताना मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळत वरील विधान केले. यावेळी त्यांनी मुंबईत भाजपला महापौर झाल्यास आपली कॉलर टाईट होणार असल्याचाही दावा केला. मंत्री लोढा म्हणाले, आपण देवाभाऊंची वेगवेगळी रूपे पाहतोय. त्यांची 100 वेगवेगळी रूपे आहेत. त्यांनी मागील वर्षभरात अनेक कामे केली. ते नागपूरचे सर्वात तरुण महापौर झाले.

## नृत्यांगणा दीपाली पाटीलची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी अहिल्यानगर, दि. ५ :**
अहिल्यानगरच्या जामखेड येथे आपल्या मैत्रिणीसोबत राहणाऱ्या दीपाली गोकुळ पाटील नामक नृत्यांगणेने शहरातील एका लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उजेडात आली आहे. या नृत्यांगणेने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण रोहित पवारांनी याविषयी एका उच्चपदस्थाकडे बोट दाखवल्यामुळे प्रकरणातील गांभीर्य वाढले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, 33 वर्षीय नृत्यांगणा दीपाली गोकुळ पाटील जामखेड येथील एका कलाकेंद्रात नृत्यांगणा म्हणून काम करत होती. ती मूळची ठाणे जिल्ह्यातील कल्याणची होती. पण सध्या ती आपल्या एका मैत्रिणीसोबत जामखेडच्या तपनेश्वर भागात किरायाने राहत होती. तिने गुरूवारी खर्डा रोडवरील हॉटेल साई लॉज येथील एका रुममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

दीपाली गुरूवारी सकाळी आपल्या मैत्रिणींना मी बाजारात जाऊन येते असे सांगून बाहेर पडली. दुपारी बराच वेळ झाला तरी ती परत आली नाही. त्यानंतर तिच्या मैत्रिणींनी तिच्याशी फोन करून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण संपर्क झाला नाही. त्यामुळे तिच्या मैत्रिणींनी ती ज्या ऑटोने गेली त्या ऑटोवाल्याची विचारपूस केली. त्याने सांगितले की, दीपालीला त्याने खर्डा रोडवरील हॉटेल साई लॉज सोडले. त्यानंतर तिच्या मैत्रिणी 5.30 च्या सुमारास त्या लॉजवर गेल्या. तिने दीपालीची विचारपूस केली. त्यानंतर त्या तिच्या रूमच्या दिशेने गेल्या असता त्यांना रूम आतून लॉक असल्याचे आढळले.

त्यांनी आवाज देऊन दीपालीला दार उघडण्यास सांगितले. पण तिने कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे लॉज चालकांनी दुसऱ्या चावीने रूमचा दरवाजा उघडला असता दीपालीने छताच्या पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याचे आढळून आले. त्यानंतर त्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. नृत्यांगणा दीपालीने आत्महत्या का केली? हे अजून स्पष्ट झाले नाही. पण या प्रकरणी तिची मैत्रिण हर्षदा रवींद्र कामठे हिच्या तक्रारीनुसार जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

## मंडलाधिकारी महिलेला लाच घेताना पकडले

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
भोरमधील मंडलाधिकारी महिलेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) एक लाखांची लाच घेताना गुरुवारी पकडले. याप्रकरणी महिलेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. त्यानुसार, तक्रारदार २३ वर्ष तरुण व्यावसायिक आहे. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीसाठी २०० ब्रास माती वाहतुकीचा परवाना त्याने भोरमधील तहसील कार्यालयाकडून घेतल होता. त्यापोटी त्याने एक लाख २६ हजार २३० रुपये रॉयल्टी स्वरूपात भरले होते. परवाना मिळाल्यानंतर माती वाहतूक सुरू करण्यात आली. निगुडघर येथील मंडलाधिकारी यांनी ३० नोव्हेंबर रोजी माती वाहतूक करणाऱ्या गाड्या अडविल्या. माती वाहतूक करण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच मागितली. पैसे न दिल्यास माती वाहतूक करू दिली जाणार नाही, अशी धमकी त्यांनी दिली. त्यानंतर तक्रारदाराला पुन्हा कार्यालयात बोलावून त्याच्याकडे लाच मागण्यात आली.

### वरळीत ठाकरे गट आणि भाजप आमने-सामने
## कामगार युनियनच्या मुद्द्यावरून गोंधळ



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि भाजपचे कार्यकर्ते वरळी येथील सेंट रेजीस हॉटेलमध्ये कामगार युनियनवरून एकमेकांना भिडल्याचे पाहायला मिळाले. सेंट रेजीस हॉटेलच्या बाहेर जवळपास अर्धा ते पाऊण तास हा गोंधळ सुरू होता. तसेच गोंधळ घालणाऱ्या कार्यकर्त्यांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या कामगार युनियनमधील काही कार्यकर्त्यांनी भाजपच्या अखिल भारतीय कर्मचारी संघात प्रवेश केला. भाजपच्या याच फोडाफोडीच्या विरोधात ठाकरे गटाची भारतीय कामगार सेना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भाजप प्रणित अखिल भारतीय कामगार संघाचे कार्यकर्ते देखील आक्रमक झाले होते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने पुढील वाद टळला. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत कामगार कार्यकर्ते का टिकत नाहीत, याचे त्यांनी आत्मपरीक्षण करावे, असा खोचक सल्ला भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. तर असली फोडाफोडी आम्हाला मान्य नाही, आम्ही शांत बसणार नाही, असे ठाकरे गटाच्या कामगार सेनेच्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

एका वृत्तसंस्थेशी बोलताना भाजप पदाधिकाऱ्याने सांगितले की, सेंट रेजीसमध्ये भारतीय जनता पक्षाची युनियन होतीच. आजही काही कार्यकर्ते आमच्याकडे आले. आमच्या युनियनचा बोर्ड लावण्यासाठी आम्ही आलो होतो जेणेकरून कामगारांचा युनियनशी चांगला संपर्क राहील आणि त्यांच्या न्याय हक्कांसाठी आम्हाला आवाज उठवता येईल. परंतु, ठाकरे सेनेच्या काही कार्यकर्त्यांनी उगीचच गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. भाजपने कोणतीही संघर्षाची भूमिका घेतलेली नाही, असे त्यांनी सांगितले आहे.

**राडा करणाऱ्यांवर कारवाई करणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, वरळी येथे झालेल्या राड्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, राडा करणाऱ्यांवर कारवाई करणार असून सगळ्यांना कामगार युनियनमध्ये त्यांच्यामनाप्रमाणे काम करण्याचा अधिकार आहे. संविधानानुसार सगळ्यांना मनाप्रमाणे काम करू द्यावे, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

## आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी महाराष्ट्र शासनाचा महासंकल्प

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शासनाने विशेष समिती स्थापन करण्याचा आदेश जारी केला असून, या समितीत विविध उच्चपदस्थ राजकीय नेते, शासकीय अधिकाऱ्यांबरोबर इतिहासतज्ज्ञांचा समावेश आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाने आग्यातील त्या जागेचे अधिग्रहण करून, स्मारकासोबत संग्रहालय व माहिती केंद्रही उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

शासनाच्या जारी झालेल्या शासन निर्णयानुसार आग्र्यामध्ये तो परिसर, जिथे छत्रपती शिवाजी महाराज यांना नजरकैद ठेवण्यात आले होते, तो महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित केला जाईल. त्याठिकाणी एक प्रतिष्ठापूर्ण स्मारक निर्माण करण्यात येईल, व निधीसाठी आवश्यक तरतूद आगामी अर्थसंकल्पात करण्याची हमी आहे.

या प्रकल्पासाठी नोडल विभाग म्हणून पर्यटन विभाग निवडण्यात आला असून, जमीन अधिग्रहण, निधी उपलब्धता, आणि विकास कामांची जबाबदारी हे विभाग करणार आहेत. स्मारकाबरोबरच, इतिहासाचे जतन व प्रदर्शन करण्यासाठी संग्रहालय, माहितीपट/दृश्य-श्राव्य कार्यक्रम असे विविध उपक्रमही या प्रकल्पाचा भाग असणार आहेत.

नव्याने स्थापन झालेल्या समितीचे अध्यक्ष म्हणून पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची निवड करण्यात आली आहे. सदस्यांमध्ये राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन विभागाचे मुख्य सचिव, व्यवस्थापकीय संचालक, तसेच पर्यटन संचालनालय मुंबई, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय मुंबईचे अधिकारी आहेत. त्याचबरोबर इतिहासतज्ज्ञ म्हणून विक्रमसिंह मोहिते, डॉ. केदार फाळके, ॲड. मारुती आबा गोळे, सुधीर श्रीरंग थोरात यांचा समावेश आहे. या समितीचे सचिव म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबईचे महाव्यवस्थापक नियुक्त करण्यात आले आहेत. या समितीचे प्राथमिक काम म्हणजे,



सर्वप्रथम त्या ऐतिहासिक जागेचे नकाशा, जमीन, व वास्तूंची पाहणी करणे व पुरावे तपासणे; नंतर स्मारकाची संकल्पना (थीम), डिझाइन, प्रकल्प रूपरेषा तयार करून ती शिखर समिती समोर सादर करणे. त्यानंतर, निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण, बांधकाम व संग्रहालयाच्या रचना सुरू होणार आहेत.

## विमान प्रवासाचे दर गगनाला भिडले

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
इंडिगो कंपनीने आपल्या फ्लाइट रद्द केल्याने देशभरातील महत्त्वाच्या विमानतळांवर प्रवाशांचा खोळंबा झाल्याचे पाहायला मिळाले. अनेक महत्त्वाच्या विमानतळांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती तसेच त्यांना मनस्ताप देखील सहन करावा लागला. यानंतर इंडिगो कंपनीने एक पत्रक जारी करत प्रवाशांची माफी देखील मागितली. त्यातच आता पुण्यातून मुंबई, दिल्ली व बांगळुरूला जाणाऱ्या विमानांच्या तिकीटांचे दर अक्षरशः गगनाला भिडल्याचे पाहायला मिळत आहे. पुण्याहून मुंबईला जाण्यासाठी तब्बल 61 हजार रुपये प्रवाशांना मोजावे लागणार असल्याचे दिसून येत आहे. यामुळे पुन्हा एकदा प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

इंडिगोच्या विमानसेवा अचानक खंडित झाल्याने इतर विमानसेवा कंपन्यांनी आपल्या तिकीट दरात मोठी वाढ केली आहे. पुणे ते मुंबई 61 हजार रुपये इतके तिकीट झाले आहे.

तसेच पुणे ते दिल्ली विमानाचे दर 27 हजार तर पुण्याहून बंगळुरूसाठी 49 हजार रुपये मोजावे लागत असल्याचे दिसत आहे. तसे पाहायला गेले तर मुंबईहून लंडनला जाण्यासाठी किमान इकॉनमी तिकीट 50 ते 70 हजार इतके आहे. तर मुंबईहून थायलंडला 15 ते 30 हजार रुपये इतके तिकीट आकारले जाते.

## नागपूर हिवाळी अधिवेशन
### राजकारण, पिकनिक आणि उपराजधानीचे बदलते स्वरूप

नागपूरमध्ये ८ डिसेंबरपासून सुरू होणारे हिवाळी अधिवेशन पुन्हा एकदा अनेक प्रश्नांना हवा देत आहे. कधीकाळी सत्ता, संघर्ष आणि प्रशासकीय जबाबदारीचे वजन असलेले हे अधिवेशन आता हळूहळू राजकीय पिकनिक, नेटवर्किंग आणि इव्हेंट कल्चरचा हंगाम बनत चालले आहे. शहरातील राजकीय जाणकारांपासून सर्वसामान्य नागपूरकरांपर्यंत सर्वजण एकच बोलताना दिसतात– अधिवेशन कमी, पिकनिक जास्त.


डॉ. प्रवीण डबली
वरिष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

उपराजधानीत सध्या हॉटेल क्षेत्रात मोठी धावपळ आहे. नागपूरची हॉटेल इंडस्ट्री हिवाळी सत्राला सरळ गोल्डन सीझन म्हणू लागली आहे. ३३ मंत्र्यांपैकी फक्त २४ जणांनाच रविभवनातील कॉटेज मिळतात. बाकी मंत्री, शेकडो अधिकारी आणि त्यांचे पाहुणे थेट प्रीमियम हॉटेलांचा पर्याय निवडतात.

शहरातील बहुतेक हॉटेल्स या काळात पूर्णपणे बुक असतात. खोल्यांचे दर ६० ते ७० हजार रुपये प्रति रात्रपर्यंत पोहोचतात. अनेक हॉटेलांनी अधिवेशन पॅकेज आणि अधिवेशन मेन्यू सुद्धा जाहीर केले आहेत. यंदा आणखी एक ट्रेंड वेगाने वाढताना दिसतो–ताडोबा, पेंच, बोर आणि करहांडला येथे वाढलेली सफारी बुकिंग. नेते, अधिकारी आणि त्यांचे पाहुणे जंगल सफारीला अनौपचारिक कार्यक्रमांचा भाग मानू लागले आहेत. सकाळ- संध्याकाळ राजकीय बैठकांमध्ये उपस्थिती आणि मधल्या वेळेत जंगलभ्रमंती– नागपूरचा नवा समीकरण स्पष्ट होत आहे.

याच्या उलट नागपूरकर विचारतात, या सत्रातून शहराच्या मूलभूत प्रश्नांचे समाधान केव्हा होणार? पाणीपुरवठा, ड्रेनेज, सीवरेज, रस्त्यांची समस्या, पेंडिंग देयके, डेंग्यूची परिस्थिती–हे प्रश्न वर्षानुवर्षे फाईलमध्येच अडकून आहेत. सरकारी खर्च मात्र वाढत चालला आहे. गेल्या वर्षी फक्त इंधनावर दीड कोटी रुपये खर्च झाले. नागभवनातील नव्या बंगल्यांसाठी २३६ कोटींचे प्रावधान, तर कार्यालयीन वापरासाठी ९४ कोटींचा वेगळा प्रस्ताव. परंतु नागरिकांच्या प्रत्यक्ष अडचणींवर समाधानकारक प्रगती कुठेच दिसत नाही. अधिवेशनाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे आंदोलन. एक काळ होता, जेव्हा नागपूरमध्ये ५०,००० लोकांचे मोर्चे निघत. आज परिस्थिती बदलली आहे. काहीशे लोकांचे प्रतीकात्मक निदर्शने, सोशल मीडिया ट्रेंड्स आणि औपचारिक घोषणा– तेवढ्यावरच आंदोलन मर्यादित झाले आहे. २००५ मध्ये शेतकरी प्रश्नावर विधानसभेत केरोसिन ओतून घेतलेला गुलाबराव गावंडे यांचा तीव्र निषेध आज अप्रूपासारखा वाटतो. १९९४ ची गोवारी चेंगराचेंगरी आजही नागपूरच्या इतिहासावरची मोठी जखम आहे–११४ जणांना जीव गमवावा लागला. त्या स्मृतीवर उभारलेला शहीद गोवारी फ्लायओव्हर आजही अव्यवस्थित वाहतूक आणि अपघातांच्या बातम्यांमुळे चर्चेत असतो. या काळात नागपूर कराराची आठवणही ताजी होते. १९५३ मध्ये राजधानीचा दर्जा गेला, पण बदल्यात एक महिन्याचे स्वतंत्र अधिवेशन देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आज ते अधिवेशन अनेकदा फक्त सातझआठ दिवसांतच आटोपते. विदभार्तील लोकांच्या भाषेत हे स्पष्टपणे व्यक्त होते– टिचका नाही, थेट चुना आहे.

या वर्षीच्या अधिवेशनात ओबीसी आरक्षण, शेतकरी प्रश्न, वीज दरवाढ, शिक्षणातील अडचणी, नागपूरच्या स्थानिक समस्या, मनपाची आर्थिक स्थिती यांसारखे मुद्दे उठण्याची शक्यता आहे. पण नागपूरकरांच्या मनातील शंका तशीच आहे–या मुद्द्यांवर खरी चर्चा होईल का? की पुन्हा एकदा राजकीय डिनर, लॉबी मीटिंग आणि हॉटेलमधील भेटीगाठींचाच जोर राहील? उपराजधानी नागपूरचे स्वरूप बदलत आहे. त्याचबरोबर अधिवेशनाची मूळ भावना देखील बदलते आहे. आणि शेवटी प्रश्न तोच–हे अधिवेशन जनतेच्या हितांचे व्यासपीठ बनेल का, की पुन्हा एकदा राजकीय पिकनिक म्हणूनच नोंदले जाईल?

# आज विदर्भ केसरी ब्रजलालजी बियाणी जयंती सोहळा

**अकोला**–ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी, भारतीय राज्य घटना समितीचे सदस्य विदर्भ केसरी ब्रजलाल बियाणी यांच्या जयंतीचा सोहळा आज शनिवार दि ६ डिसेंबर रोजी सकाळी ८-३०वाजता स्थानीय गांधी जवाहरलाल बाग मधील स्व भाईजीच्या पुतळा परिसरात आयोजित करण्यात आला आहे.माहेश्वरी समाज ट्रस्ट,अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघ,विदर्भ चेंबर,जेष्ठ नागरिक संघ व राजस्थानी सेवा संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राजस्थानी सेवा संघाचे माजी अध्यक्ष व माजी नगरसेवक सिद्धार्थ शर्मा उपस्थित राहणार आहेत. या



कार्यक्रमात स्व भाईजींना आदरांजली वाहण्या साठी सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन माहेश्वरी समाज ट्रस्टचे प्रधानमंत्री विजयकुमार राठी,अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मीर साहेब,विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कुळकर्णी,राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल यांनी केले.

# मेळघाटचे वनवैभव,आदिम संस्कृतीचे घडणार दर्शन

**▪जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडून स्थळांची पाहणी ▪सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल; महोत्सवात वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम**

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. त्यात सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल, तसेच वनपर्यटन, नौकाविहार आदी वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम असतील. त्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज अकोट येथे दिले.

महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांची बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत अकोट येथील उपविभागीय कार्यालयात झाली झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक राहूलसिंग तोलिया, उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, तहसीलदार सुनील चव्हाण, समाधान सोनवणे व इतर अधिकारी, तसेच महोत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते.पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव १३ वर्षांनंतर पुन्हा आयोजित करण्यात येत आहे. मेळघाटचे समृद्ध वनवैभव, ऐतिहासिक नरनाळा किल्ला, आदिम संस्कृती व परंपरांचे दर्शन महोत्सवातून घडणार असून, नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला



सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, गिर्यारोहण आदी साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. त्या अनुषंगाने स्थळ पाहणी जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी केली.

यावेळी त्यांनी पोपटखेड येथील जलाशय प्रकल्प, शहानूर येथे भेट दिली. यावेळी त्यांनी समिती सदस्य, स्थानिक प्रतिनिधींशी संवाद साधून चर्चा केली. नौकाविहार, वनपर्यटनाबरोबरच पॅरासेलिंग व साहसी खेळांचा महोत्सवात समावेश आहे. वन्यजीवनाची सफर घडविण्याबरोबरच विविध कलाप्रदर्शनातून सातपुड्याच्या संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. त्यासाठी सुसज्ज दालने, दर्जेदार उपक्रमांची आखणी करावी. महोत्सवाच्या दृष्टीने आवश्यक रस्तेदुरूस्ती, बस, इतर सुविधांची तयारी वेळेत करावी. महसूल, वनविभाग, पाटबंधारे विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने महोत्सव यशस्वी करावा, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. महोत्सवाची व्यापक प्रसिद्धी व्हावी. स्वयंसेवी संघटनांचा सहभाग मिळवावा. महोत्सवाची माहिती सर्वदूर पोहोचण्यासाठी व्हिडीओ, माहितीपट, बातम्या, फलक आदींद्वारे सर्वदूर प्रसिद्धी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी दिले.

## पोलीस स्टेशन अकोट शहरची दारूची धडक कार्यवाही

# देशी दारू चा ५३,२८० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

पोलीस अधिक्षक सा यांनी सुरू केलेल्या प्रहार मोहीम अंतर्गत तसेच इलेक्शन संबंधाने पो. स्टे परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारार्फत मिळालेल्या माहिती वरून दि ०४/१२/२०२५ रोजी पो.स्टे अकोट शहर चे डि. बी पथक चे नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ मोहन दुर्गे, पोकॉ अश्विन चौव्हाण असे मिळालेल्या माहिती प्रमाणे सोनु चौक अकोट येथे दोन पंचासोबत थांबुन माहिती प्रमाणे एक इसम त्याचे मोटर सायकलवर आठवडी बाजार कडून येतांना दिसला सदर इसमास पो. स्टॉफ च्या मदतीने थांबवुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राजु तेजराव सरदार वय ३६ वर्ष रा. सौदंळा ता. तेल्हारा जि. अकोला असे सांगितले व पंचासमक्षं त्याचे जवळ असलेल्या थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये मॅकडॉल कंपनीच्या १८० एम एल च्या सिलबंद कॉटर एकुण २४ नग प्रत्येकी कॉटर किंमत २२० /- रू दराणे असे एकुण ५,२८० /- रू चा व एक जुनी वापरती काळया रंगाची हिरो डेस्टीनी स्कुटी क्र एम एच ३० बी एस ३४९४ किं अं ४८,००० /- रू असा एकुण ५३,२८० /- रू चा मुद्देमाल जप्ती पत्रका प्रमाणे पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला वरून पो.स्टे 'अकोट शहर येथे अप नं ४७१



/ २०२५ कलम ६५ (ई) म.दा.का प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील कार्यवाही करीत आहो. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री बी. चंद्रकांत रेड्डी, मा. सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट श्री निखील पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. श्री अमोल माळवे, डि.बी. पथक इंचार्ज पोउपनि वैभव तायडे, नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ मोहन दुर्गे, पोकॉ अश्विन चौव्हाण यांनी केली आहे.

## जठारपेठ भागात १,००० कापडी पिशव्यांचे मोफत वितरण

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

पर्यावरण संरक्षण गतिविधी अंतर्गत पेड़ - पाणी - पॉलिथीन या तीन आयामांपैकी पॉलिथीन निर्मूलन या आयामावर आधारित कचरा निर्मूलन व पर्यावरण संवर्धन या उद्देशाने जठारपेठ भागातील महाकाली नगर संघाच्या व मै वसुधा विकास (डॉ योगेश व डॉ मनीषा पालीवाल) वतीने नागरिकांसाठी एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत समाजातूनच जुन्या, वापरात नसलेल्या साड्या संकलित करून त्या गरजू कामगारांकडून कापडी पिशव्या तयार करून घेण्यात आल्या. अशा प्रकारे सुमारे १,००० टिकाऊ कापडी पिशव्या शिवून तयार करण्यात आल्या. पर्यावरणपूरक या पिशव्या प्लास्टिकच्या वापराला पर्याय ठरून प्लास्टिक निर्मूलन व कचरा कमी करण्यासाठी मोलाचे योगदान देतील.या कापडी पिशव्यांचे मोफत वितरण रविवार, दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता स्थळ, गिरीधर डेअरी, सम्राट हॉटेलच्या बाजूला, महाकाली नगर, जठारपेठ, अकोला येथे करण्यात येणार आहे.त्यामुळे पर्यावरण संरक्षणात आपले योगदान देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यावरण संरक्षण गतिविधी, अकोला महानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे

## समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांना विविध संघटनांची श्रध्दांजली

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी)**

ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी, मराठवाडा दैनिकाचे माजी संपादक, माजी राष्ट्र सेवा दल प्रमुख, समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे नुकतेच निधन झाले. अ.भा. समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या वतीने साने गुरुजी वाचनालयात खाजगी शिक्षण संस्था संचालक मंडळाचे जिल्हाध्यक्ष ॲड विलास वरवरे यांचे अध्यक्षतेखाली श्रध्दांजली सभा संपन्न झाली. पन्नालालजी सुराणा प्रखर देशभक्त होते.आणीबाणीत काही काळ त्यांचा सहभाग सहवास अकोलेकरांना लाभला.तेव्हा त्यांनी महाविद्यालयीन युवकांना एकत्र करून सामाजिक न्याय, समतेच्या विचारांचे स्फुल्लिंग तरुणांमध्ये पेरले होते.असे प्रेरणादायी व्यक्तिमत्व हरपल्याचे प्रतिपादन ॲड. विलास वखरे यांनी केले. कष्टकरी शेतकरी वर्गाची लढाई पन्नालालजी लढले.आपली लेखणी त्यांनी समाजातील वंचित घटकाच्या हक्कासाठी झिजवली. त्यांच्या जाण्याने चळवळीच्या युगाचा अस्त झाला अशा शब्दात वनराई बालकुमार साहित्य संमेलनाचे संयोजक बबनराव कानकिरड यांनी श्रद्धांजली वाहिली. किल्लारी- लातूर भागात मोठ्या प्रमाणावर भूकंप झाला असताना अनाथ झालेल्या मुलांसाठी पन्नालालजींनी लोक सहभागातून धरती विद्यालय सुरू केले. अनाथां चे नाथ बनले. त्यांच्या राहण्याची, शिक्षणाची सोय केली. त्यांच्या जाण्याने गरजू विद्यार्थ्यांचा आधार संपल्याचे प्रतिपादन अ.भा. समाजवादी शिक्षण हक्क सभेचे जिल्हाध्यक्ष




प्रा.विवेक हिवरे यांनी श्रद्धांजली वाहिली. समाजातील शेवटच्या घटकाला बालवाडी ते उच्च शिक्षण मोफत व उच्च दर्जाचे मिळावे यासाठी त्यांनी लढा दिला. सर्व वंचित बहुजन घटकांचे वतीने देशमुख शिक्षण मंचाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र टाले यांनी श्रद्धांजली वाहिली. राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट दिनकर बुंदे,साने गुरुजी कथामालेचे अरविंद पाठक, राष्ट्रसेवा दलाचे शहराध्यक्ष श्यामभाऊ कमला कर दुर्गे, महाराष्ट्र अंनिसचे प्रा. प्रवीण वाघमारे, व-हाडी बोली अभ्यासक डॉ.रावसाहेब काळे, छत्रभारती संघटनेचे ऋषिकेश निमकंडे, संजय इंगळे भटोरी, गजानन भिमकर,विजय अंभोरे साहेबराव गवई,भानुदास दगडूजी गायकवाड, कृष्णा अरविंद चौके, सागर पुरुषोत्तम काळे यांच्यासह समाजवादी अध्यापक सभा, राष्ट्रसेवा दल,साने गुरुजी कथामाला, श्री गुरुदेव सेवा मंडळ व असंख्य कार्यकर्त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# नवीन प्रशासकीय इमारतीसाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासनाने तांत्रिक सल्लागार म्हणून एका कंपनीची नियुक्ती केली आहे. ही नवी प्रशासकीय इमारत टॉवर ते रतनलाल प्लॉट मार्गावरील उर्दू शाळेच्या जागेत उभारली जाणार आहे. सध्या महापालिकेच्या कार्यालयासाठी उपलब्ध असलेली जागा, सभागृह आणि भविष्यात वाढणारी नगरसेवकांची संख्या लक्षात घेऊन प्रशासनाने नवीन इमारतीसाठी जागेचा शोध घेतला होता. अनेक ठिकाणच्या शोधानंतर, नझूल शिट क्रमांक ५५, नझूल भूखंड क्रमांक ११- १ मधील २५, ५६७ चौरस मीटर जागेचा आगाऊ ताबा जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिकेला दिला आहे. यापूर्वी इमारतीच्या बांधकामासाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, अनेक वर्षे उलटल्यामुळे आता शासनाने इमारतीच्या बांधकामासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका प्रशासनाने बांधकाम सुरू करण्याच्या उद्देशाने तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा पाच निविदा प्राप्त झाल्या, परंतु तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्यामुळे प्रशासनाने पुन्हा फेर-निविदा प्रसिद्ध केल्या. फेर - निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आणि तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्याने एका कंपनीची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



## थकित करापोटी पश्चिम झोन येथील मालत्तावर सीलची कारवाई

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत डाबकी रोड येथील रेणुका नगर स्थित वार्ड क्रं. बी -६ मालमत्ता क्रं. ३४५, श्रीमती पार्वताबाई दांदळे यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,२५,५५१/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मालमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत सहा.कर अधिक्षक राजेश जाधव, कर वसुली लिपिक राजेश धारस्कर, प्रकाश मालगे, मुदस्सर अमीन, सै.अजहर, सुनिल गरड आदींची उपस्थिती होती.अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील, जप्ती व लीलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# अकोला रेल्वे स्थानकावर चोरीच्या घटना वाढल्या

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

अकोला रेल्वे स्थानक परिसरात गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. रेल्वे पोलिस दल (आरपीएफ) आणि सरकारी रेल्वे पोलिस (जीआरपी) यांच्यावर प्रवाशांची सुरक्षा राखण्याची जबाबदारी असली, तरीही त्या जबाबदारीत हे दोन्ही विभाग अपयशी ठरत असल्याची प्रवाशांची तक्रार आहे.

प्राप्त माहितीनुसार, अकोला रेल्वे स्थानकावरून ये-जा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या गाड्यांमध्ये झालेल्या घटनांमध्ये प्रवाशांचे एकूण ४ लक्ष ३३ हजार १०० रुपयांचे मौल्यवान सामान अज्ञात चोरट्यांनी लंपास केले आहे. पीडित प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, गाड्यांमध्ये वारंवार उचलबांगडी होत असून, चोरांचा धाडस दिवसेंदिवस वाढत आहे. तक्रारींनुसार, जीआरपीने संबंधित घटनांवर गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे; मात्र चोरीच्या घटनांच्या तुलनेत तपासाचा वेग अत्यंत कमी आणि नगण्यअसल्याचे उघड झाले आहे. एका प्रवाशाने तर सुरक्षेची जबाबदारी पार पाडणाऱ्या विभागांवर थेट टीका करत 'हे अधिकारी फक्त रोजंदारीवर काम करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे कर्तव्य पार पाडतात. प्रवाशांची सुरक्षा त्यांच्या दृष्टीने प्राधान्यक्रमावर नाही' असे कठोर शब्दांत मत व्यक्त केले. प्रवाशांच्या वाढत्या तक्रारी आणि असंतोष लक्षात घेता काही नागरिकांनी प्रशासनाला सुचवले की अकोला जीआरपी अधिकाऱ्यांना तात्काळ नियंत्रण कक्षात नियुक्त करावे, वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कर्तव्यावर असलेल्या आणि कार्यक्षमतेत कमी पडणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुख्यालयात हलवावे, आणि त्यांच्या जागी नवीन नियुक्त अधिकारी व कर्मचारी तैनात करावेत, ज्यामुळे तपासाची गुणवत्ता आणि गस्त वाचेल. अकोला स्टेशनवरील चोरीच्या वाढत्या घटनांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह उभे केले नसून, पोलिस विभागाच्या कार्यक्षमतेबरली तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. यात तातडीने सुधारणा न झाल्यास प्रवासी आणि त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा

# निंबीवासिय नागरीकांचा निवडणूकांवर बहिष्कार!

## जोपर्यंत निंबीला जोडणारी पक्की सडक नाही,तोपर्यंत मतदान नाही!

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

बाळापूर तालूक्यातील निंबा गावालगत असलेल्या निंबी येथील रस्ता अनेक वर्षात डांबरीकरण न केल्याने या बाबींचा निषेध म्हणून येथील गावकऱ्यांनी एकत्र येऊन आगामी निवडणूकांमधील मतदानावर बहिष्कार टाकत असल्याचे जाहिर केले आहे.याबाबतचे लेखी निवेदन त्यांनी राज्य निवडणूक आयोग, मुंबई , जिल्हाधिकारी ,अकोला जि.प.मुख्य कार्यपालन अधिकारी,जिल्हा पोलिस अधिक्षक,उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी,व तहसिलदार बाळापूर यांचेकडे नुकतेच सादर केलेले आहे.

अकोला ते निंबा फाटा ते निंबा आणि जळगाव जामोद व पुढे मुक्ताईनगरकडे जाणारी ही मुख्य सडक आहे.या रस्त्यावरून निंबी या गावाला जोडलेला हा रस्ता फक्त २.५० कि.मी. आहे.परंतू स्वातंत्र्यानंतर एकदाही या रस्त्याचे संपूर्ण डांबरीकरण झालेले नाही. कधी एक तर कधी अर्धा किं.मी.नित्कृष्ट काम




करून गावकऱ्यांची बोळवण करण्यात आली. त्यानंतर त्याची कधीही डागडूजीही न झाल्याने त्याला प्रचंड खोल असे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे या रोडवरील शेतातील माल घरापर्यंत नेण्यासाठी निंबा फाट्याकडील दररोजच्या प्रवासासाठी शेतकरी आणि नागरीकांना असंख्य अडचणींना तोंड देत फेऱ्या कराव्या लागतात.पावळ्यात या रस्त्यावरील खड्डे पाण्याने तूडूंब भरतात.त्यामुळे विद्यार्थी एक-दोन महिणे निंबा येथील शाळेत किंवा इतरत्र जाऊ शकत नाहीत.या रस्त्यावरून पायी चालणे पण मुश्कील असल्याने नागरीकांना अनेक हाल अपेष्टांना तोंड द्यावे लागत आहे.हा रस्ता अकोला जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून त्यासाठी गावकऱ्यांनी वेगवेगळ्या पातळीवरून प्रयत्न केले.परंतू त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. म्हणून हतबल झाल्याने निंबी ग्रामवासियांनी एकत्र येत आता येणाऱ्या निवडणुकांमधील मतदानांवर बहिष्कार टाकण्याचा एकमुखी निर्णय घेतलेला आहे.जोपर्यंत ही पक्की सडक होणार नाही,तोपर्यंत निंबी गावातील एकही मतदार निवडणुकीत मतदान करणार नाही.असा एकमुखी निर्णय राज्य निवडणूक आयोग आणि जिल्हा तथा तालूका पातळीवरील अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन कळिवला आहे. या निवेदनावर एकनाथ भिवटे,बाळकृष्ण भिवटे,संदिप सगणे, तंटामुक्ती अध्यक्ष,राजाराम सगणे,सरपंच विशाल वानखडे,अशोक वानखडे, पंढरीनाथ भिवटे व असंख्य गावकऱ्यांच्या सह्या आहेत.

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.०
## जिल्ह्यात पाणलोट महोत्सवात विविध उपक्रम
### अधिकाधिक लोकसहभागासाठी जिल्हाधिका-यांचे आवाहन

▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : मृद व जलसंधारणाविषयी जनजागृतीबरोबरच जल प्रकल्पांच्या देखभाल–दुरूस्ती आदी कार्यात लोकसहभाग वाढविण्यासाठी जिल्ह्यात पाणलोट महोत्सव राबविण्यात येत आहे. गावांमध्ये जलसमृद्धीच्या दृष्टीने पाणलोट व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे असून, महोत्सवातील विविध उपक्रमांत अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.



प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना– पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वॉटरशेड महोत्सव राबविण्यात येत असून, दि. १६ डिसेंबरपर्यंत अनेक उपक्रम घेतले जाणार आहेत. तेल्हारा तालुक्यातील बोरव्हा येथे दि. ८ डिसेंबरला, बार्शिटाकळी तालुक्यातील सावरखेड येथे दि. ९ डिसेंबरला, मूर्तिजापूर तालुक्यातील अनभोरा येथे दि. १० डिसेंबरला, अकोला तालुक्यातील येळवण येथे दि. ११ डिसेंबरला, पातूर तालुक्यातील वरणगाव येथे दि. १२ डिसेंबरला, बाळापूर तालुक्यातील तामशी येथे दि. १३ डिसेंबरला कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाद्वारे नवीन कामांसाठी भूमीपूजन, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण, नागरिक संवाद आदी कार्यक्रम होतील, अशी माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर यांनी दिली.

सोशल मिडीया स्पर्धा पाणलोटाबाबत जनजागृती, लोकसहभाग वाढविण्यासाठी, पाणलोट विकास कामांना प्रोत्साहनासाठी सामाजिक माध्यम स्पर्धा आयोजिण्यात आली आहे. स्पर्धकांना पाणलोट विकास घटक– प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, तसेच इतर केंद्र किंवा राज्य शासनाच्या पाणलोट विकास योजनेत झालेली जलसंधारणाची कामे, फलोत्पादन, कृषी वनीकरण उपक्रम या विषयावरील रील्स आणि छायाचित्रे पाठविता येतील. रील्स घटकात पाच सर्वोत्कृष्ट रील्सला प्रत्येकी ५० हजार रू. आणि १०० निवडक छायाचित्रांना प्रत्येकी १ हजार रू. अशी बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेत ३० ते ६० सेकंदाचा लघु व्हिडीओ, रील्स सादर करता येईल. सहभागींनी आपले व्हिडीओ किंवा छायाचित्र समाजमाध्यमांवर पोस्ट केल्यावर दि. ३१ डिसेंबरपूर्वी मृद व जलसंधारण विभागाच्या संकेतस्थळावर (wcd.mksy.dolr.gov.in/registerMahotsav) नोंदणी करणे आवश्यक आहे. पोस्ट करताना WCD-PMKSY वॉटरशेड महोत्सव२०२५ असा हॅशटॅग वापरणे आवश्यक आहे. पोस्टची लिंक ऑनलाईन नोंदणी अर्जात नमूद करावी. नोंदणी यशस्वी झाली की ई–मेलद्वारे पुष्टी केली जाईल. अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेण्याबाबत आवाहन श्री. मस्कर यांनी केले.

## तुरीवर अळीचा अटॅक

**अकोला :** सद्या तुरीचे पिक बहरले असून फुले व शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहेत. मात्र अचानक अळीने तुरीवर हल्ला केल्याने शेतकरी वर्ग धास्तावला आहे. तसेच फवारणीचा अतिरिक्त खर्च शेतकरी यांना करावा लागत आहे. तसेच यामुळे तुरीच्या उत्पादनातही घट येण्याची शक्यता शेतकरी यांनी व्यक्त केली आहे.

## रोहीणखेड नियतक्षेत्रात बिबट (नर) मृत अवस्थेत आढळला

▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : मोताळा वनपरिक्षेत्रा अंतर्गत रोहीणखेड वतुर्ळामध्ये रोहीणखेड नियतक्षेत्रात दिनांक– ०५.१२.२०२५ रोजी मौजे सारोळा पिर येथे श्रीमती केशरबाई शांताराम गवळी यांचे मालकीचे शेत गट क्रमांक ८५ मध्ये वन्यप्राणी बिबट (नर) मृत अवस्थेत आढळुन आला. सदर घटनेची माहीती वरिल शेतक– याने वनविभागाला कळिवण्यात आले. त्यानुसार वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी त्वरीत हजर होऊन मोका पाहणी करण्यात आली.

आजुबाजुच्या परिसरामध्ये फिरुन पाहणी करण्यात आली. . मौजे सारोळा पिर मध्ये दवंडी देऊन शेतक–यांना सतर्क राहण्याची सूचना दिल्या. त्यानंतर वन्यप्राणी मृत बिबट ला वनपरिक्षेत्र कार्यालय, मोताळा येथे आणण्यात आले. नियम ानुसार मृत बिबटचे शवविच्छेदन करुन दहण विधी पार पाडण्यात आला. सदर घटनेची माहीती मा. तहसिलदार मोताळा, वन्यजीव तज्ञ श्री ई. एच. पठाण तसेच संबधीत गावाचे सरपंच यांना देण्यात आली. मा. ओ. व्ही. आपेट सहाय्यक



वनसंरक्षक (प्रादे व कॅम्पा ) बुलडाणा यांचे म ार्गदर्शनाखाली अज्ञात करुन वनगुन्हा जारी करुन श्री. एन. एन. काळे वनपरिक्षेत्र अधिकारी मोताळा (अति. कार्यभार), श्री पी. एम. नारखेडे वनपाल रोहीणखेड, श्री. ओ. एन. सपकाळ वनपाल मोताळा, श्री आर. बी. सिरसाट वनरक्षक, श्री. एल. डी. राठोड वनरक्षक, श्री. के. एन. तराळ, वनरक्षक हे पुढील चौकीशीचा तपास करीत आहेत'

## अकोट येथे वसतिगृहासाठी जागेचा शोध

▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : सामाजिक न्याय विभागाच्या अकोट येथील मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहासाठी जागेचा शोध सुरू आहे.

त्यासाठी सुस्थितीतील इमारत, किमान ८ हजार चौ. फु. चटई क्षेत्र असावे. ८ स्नानगृहे, ८ स्वच्छतागृहे, ८० पलंग सुव्यवस्थित ठेवता येतील. गृहपालाची राहण्याची व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था, पाण्याची पुरेशी व्यवस्था अशा पद्धतीचे बांधकाम असलेली इमारत असल्यास किमान ३ वर्षांचा इमारत करार मालकासोबत करण्यात येईल. इच्छूकांनी मुलींचे शासकीय वसतिगृह, पोपटखेड रस्ता, अकोट येथे २० डिसेंबरपूर्वी संपर्क साधावा.

## तहसील प्रवेशद्वारावर ड्रोन पडल्याने नागरिकांमध्ये दहशत

▪पातुर,दि ४ (प्रतिनिधी) : ४ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास पातुर तहसील कार्यालयाच्या आतील प्रवेशद्वारासमोर अचानक एक ड्रोन फिरत फिरत येऊन पडल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी भीती आणि दहशत पसरली होती. घटनेची माहिती पातुर पोलिसांना मि ळताच पोलीस निरीक्षक हनुमंत डोपेवाड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि ते ड्रोन जप्त केले. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेले हे ड्रोन शहाबाबू उर्दू हायर एज्युकेशन महाविद्यालयाचे होते. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनीमध्ये सदर ड्रोनचा डेमो (प्रात्यक्षिक) दाखवत असताना, ते ड्रोन ५०० मीटरच्या हद्दीबाहेर गेल्यामुळे त्यावरील नियंत्रण सुटले आणि ते पातुर तहसीलच्या आवारात येऊन पडले. ड्रोन पडल्यानंतर नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चेला उधाण आले होते. सदर ड्रोनद्वारे परिसराची रेकी करून त्याची ब्लू प्रिंट काढून समाजकंटकांकडून हल्ल्याचा नियोजित कट तर रचला जात नाही ना ? असा सूर नागरिकांतून उमटत होता.

## गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत

**अकोट :** गजानन महाराजांच्या पालखीचे आज अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तीपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसरात 'गण गण गणात बोते' चा निनाद घुमत होता. ठाणेदार जुनघरे आणि पीएसआय काटोले यांच्या उपस्थित पालखीचे पोलीस स्टेशनमध्ये आगमन झाले. पालखी पोलीस स्टेशनमध्ये पोहोचताच सर्वप्रथम संत गजानन महाराजांची आरती ठाणेदार जुनघरे व पीएसआय काटोले यांच्या हस्ते करण्यात आली.

## विहिरीत सापडलेल्या युवकाच्या मृतदेहामुळे खळबळ

▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : अकोला रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक एकच्या बाजूला असलेल्या विहिरीत एका युवकाचा मृतदेह आढळून आला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सकाळी परिसरातील कर्मचाऱ्यांना ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ रेल्वे पोलिसांना माहिती दिली. काही क्षणातच जीआरपीचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, पिंजर येथील संत गाडगेबाबा आपत्कालीन बचावपथकाने तत्परता दाखवत विहिरीत उतरून मृतदेह बाहेर काढला. मृत युवकाची ओळख अद्याप पटलेली नसून हा प्रकार आत्महत्या आहे की घातपात, याबाबत जीआरपीकडून सर्व शक्यता तपासल्या जात आहेत. मृतदेहाला पंचनामा करून शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून वैद्यकीय अहवालानंतर अधिक माहिती स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. अचानक घडलेल्या या घटनेमुळे रेल्वे स्थानक परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

## इस्त्रो विमानवारीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक आणि सत्कार

**मूर्तिजापूर :** अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांतर्गत जिल्हाधिकारी मा. वर्षा मीना यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या विज्ञानवेध या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मूर्तिजापूर येथे कौतुक आणि सत्कार करण्यात आला. वर्षा मीना,जिल्हाधिकारी अकोला. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अकोला. ग्रामीण भागातील आणि जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वैज्ञानिकांची भेट आणि वैज्ञानिक स्थळांची माहिती घेण्याची संधी उपलब्ध करून देणे. संपूर्ण जिल्ह्यातून जि. प. शाळांमधीलआठवीतइयत्ता सहावी ते शिकणाऱ्या १५ मुली आणि १५ मुले यांची निवड करण्यात आली आहे. प्रवासाचे नियोजन: निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इस्त्रो बंगळूर आणि दक्षिण भारतातील म्हैसूर, तिरुवनंतपुरम येथील इतर वैज्ञानिक स्थळांना विमान, रेल्वे आणि बस प्रवासाद्वारे भेटी देण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मधापुरी गुंजन अमोल खांडेकर, ज्ञानेश्वरी रमेश खांडेकर. उपस्थित होते. : गट साधन केंद्र,मूर्तिजापूर येथील गटसमन्वयक कैलास सोळंके, जि. प. प्राथ. शाळा मधापुरीच्या मुख्याध्यापिका शारदा ढोकणे, मनमोहन जामनिक, आणि भुगुल (मुख्याध्यापक, हिवरा कोरडे) यांनी शाळेला भेट दिली. या दोन्ही विद्यार्थिनींचा सत्कार केला.

## चारचाकी चालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : रेल्वे स्थानक परिसरातील बेपर्वाईने केलेल्या वाहनचालनाने एका निर्दोष व्यक्तीचा जीव घेतला. मुंबईतील रहिवासी जगदीश मेश्राम हे अकोला रेल्वे स्थानक परिसराबाहेरील एक्झिट गेटजवळ पडलेले असताना, २९ नोव्हेंबर रोजी एका चारचाकी वाहनचालकाने बेदरकारपणे गाडी चालवत त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. जखमी अवस्थेत त्यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र ३० नोव्हेंबर रोजी उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच जीआरपी पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला. यानंतर, मृत व्यक्तीचे भाऊ यांच्या तक्रारीवरून चारचाकी वाहनचालकाविरुद्ध सदोष मनुष्यवध ( ३०४ ) तसेच संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चालकाने बेपर्वाईने वाहन चालवत मानवी जीवाला धोका निर्माण केला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.घटनेनंतर आरोपी चालक फरार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ही गंभीर घटना आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## एकलव्य छात्रावास मध्ये विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित व गाईडस वाटप




▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी) : आदिवासी आश्रम शाळा व एकलव्य छात्रावास येथे रोटरी क्लब ऑफ अकोटतर्फे विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित साहित्य संच तसेच गाइड पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अभ्यासात आवश्यक साधनांची उपलब्धता करून देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या वितरण कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अकोट चे अध्यक्ष इंजि.रवि पवार,विवेक रघुवंशी,अभिजीत हाडोळे,ज्ञानेश्वर मानकर,शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून रोटरी क्लबच्या सामाजिक कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## तुकाराम चौकात पोलिस चौकीची गरज!

अकोला : येथील तुकाराम चौकात पोलिस चौकशी गरज निर्माण झाली आहे. या भागात अनेक रहिवासी वसाहती नव्याने निर्माण झाल्या आहेत. शिवाय अनेक सदनिकांही झाल्या आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढली आहे.

## निधन वार्ता
### सौ सिमाताई डोब

जळगाव जामोद शहराच्या माजी नगराध्यक्ष



सौ सिमाताई कैलास डोबे यांचे निधन झाले असून त्यांच्यावर जळगाव येथे आज दिनाक ६/१२/२५ ला ११ वाजता अत्यवीधी होनार असूनत्या हिवरखेड येथे नगर परीषदचे लेखा कर्मचारी तथा दै लोकमत प्रतीनीधी राजेश अस्वार यांची बहीन आहेतईश्वर मृतआत्म्यास शांती प्रदान करो ओमशांती.

## थोडक्यात

### महिला न्यायाधीशाचा विनयभंग करणाऱ्या आरोपी वकिलाचा जामीन अर्ज फेटाळला!

**अकोला :** आरोपी वकील सौरभ दीपांकर तेलगोटे याने महिला न्यायाधीश यांचा विनयभंग केल्याची घटना १६ जुलै रोजी घडली. याप्रकरणी बचाव व सरकार पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेतला. तसेच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्यानंतरदेखील आरोपी वकिलाचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे.आरोपी वकील सौरभ दीपांकर तेलगोटे (३५) हा अकोला न्यायालयातील एका महिला न्यायाधीश यांचा पाठलाग करत असायचा याबाबत त्याला समज देण्यात आल्यानंतरसुध्दा जबरदस्तीने न्यायाधीश यांच्या दालनात आरोपी वकील तेलगोटे याने जाण्याचा प्रयत्नदेखील केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यांच्या दालनासमोर कर्तव्यावर असलेले शिपाई यांच्यासोबत शाब्दिक वाद करून त्यांच्यासोबत झटापट करीत धक्काबुक्की केली होती. तसेच दालन व न्यायालयासमोर वारंवार चकरा मारणे असे प्रकार आरोपी वकील याचे नित्याचेच झाले होते. कारण नसताना शिपाई यांच्यासोबत चर्चा करत त्यांना भेटण्यासाठी आग्रह करून त्यांच्यासोबत शाब्दिक वाद करीत होता. हा प्रकार एवढ्यावरच न थांबता आरोपी वकील सौरभ तेलगोटे याने इंस्टाग्रामवर फॉलो अपमानास्पद पोस्ट करून केल्याचे रामदासपेठ पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सौरभ दीपांकर तेलगोटे याच्याविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५, ७८, १३२, ३५२, ३५१ (२), ३५१ (३) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (सी), ६७ अन्वये गुन्हा दाखल केला. आरोपीद्वारे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर जामिनासाठी अर्ज सादर केला. परंतु, सदर अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. या प्रकरणात न्यायालयात सरकार पक्षातर्फे विधिज्ञ, ॲड. राजेश आकोटकर यांनी काम काज पाहिले.

### मूर्तिजापुरात स्ट्रॉंग रूमला सशस्त्र सुरक्षा

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत २ डिसेंबर रोजीचे मतदान पार पडले. ईव्हीएमची योग्य हाताळणी व सुरक्षित ठेवण्याबाबत आयोगाचे आदेश असून, त्यानुसार देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांचे काटेकोर पालन करण्यात येत आहे. आयोगाच्या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी स्ट्राँग रूम गोडावूनच्या साठवणूक व व्यवस्थापनाकरिता जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून, मतदान यंत्र साठवणूक ठिकाणालगत सर्व प्रकारची सुरक्षा उपकरणे आवश्यक तिथे बरेकेटींग करण्यात आले. २४ तास सशस्त्र चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. त्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षकअजित जाधव यांनी १४ डिव्हिजनल तर ६ मुख्यालयाचे असे एकूण २० पोलिस कर्मचारी सतर्कतेच्या पहारा देण्यासाठी नियुक्त केले आहेत. एका एसआरपीएफ तुकडीचा यात समावेश आहे. या बाबतची नियुक्त त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणाची संपूर्ण जबाबदारी पीएसआय गणेश सूर्यवंशी, व चंदन वानखडे पार पाडीत आहे. या बाबत संपूर्ण सुरक्षा पाहणी निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार, पोलिस निरीक्षक अजित जाधव, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश जाधव यांनी गुरुवारी केली. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोडावून व सुरक्षा व्यवस्थापन अवगत करावयाचे असून त्यांच्या मागणीनुसार त्यांना स्ट्राँग रूम सुरक्षेबाबत पाहणी करता येणार आहे. निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधींना मतदान यंत्र साठवणुकीच्या गोडावूनचे द्वार दिसेल.

## पातूर येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'आयुर–पर्यवेक्षिका' कार्यक्रम उत्साहात संपन्न
### डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयात विद्यार्थ्यांना आयुर्वेदाची प्रत्यक्ष ओळख

▪पातुर,दि ४ (प्रतिनिधी) : श्री धनैश्वरि मानव विकास मंडळ संचलित डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर, जि. अकोला येथे नवीन प्रवेश घेतलेल्या इअचड विद्यार्थ्यांसाठी आयोजित आयुर–पर्यवेक्षिका (Ayur-Orientation Programme) हा विशेष उपक्रम मोठ्या उत्साहात व शैक्षणिक वातावरणात पार पडला.



या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचा व्यापक इतिहास, महाविद्यालयाची वैशिष्ट्ये, शैक्षणिक सुविधा, हॉस्पिटलची रचना, रुग्णसेवेची पद्धत, तसेच आयुर्वेदातील भविष्यातील संधी यांची सखोल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षपद संचालक डॉ. साजिद शेखकार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे संचालक डॉ. साजिद शेख यांनी भूषविले. विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांनी सांगितले तुम्ही डॉक्टर होण्याच्या पवित्र प्रवासाची आज पहिली पायरी चढत आहात. आयुर्वेद केवळ उपचारपद्धती नसून, तो एक जीवनदर्शन आहे. हे महाविद्यालय तुमचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. प्रमुख अतिथी डॉ. पोदाळे सर (गुरुदेव सेवा मंडळ आयुर्वेद कॉलेज, मोझरी)या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. पोदाळे सर उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनात त्यांनी स्पष्ट केलेआयुर्वेद शास्त्र जगभर झपाट्याने विस्तारत आहे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे हे शिक्षण घेतले तर समाजाला आरोग्याच्या दिशेने नवे योगदान देता येईल.प्राचार्या डॉ. काटोले व उपप्राचार्य डॉ. अभय भुस्कळे यांचे मार्गदर्शनमहाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री काटोले यांनी महाविद्यालयातील विभागांची माहिती, प्रयोगशाळा सुविधा, पंचकर्म केंद्र, शैक्षणिक कार्यशैली यावर सविस्तर प्रकाश टाकला.उपप्राचार्य डॉ. अभय भुस्कळे यांनी विद्यार्थ्यांनी अनुसरण्याची शिस्त, उपस्थिती धोरण, रुग्णालयातील प्रत्यक्ष प्रशिक्षण, तसेच आयुर्वेदातील संशोधनसंभावना याबद्दल मार्गदर्शन केले.महाविद्यालय व रुग्णालयाचा प्रत्यक्ष अनुभव नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनापंचकर्म विभागरसायन–प्रायोगिक विभागद्रव्यगुण प्रयोगशाळाआयुर्वेदिक रुग्णालयातील विविध जझऊ व खझऊ औषधनिर्मिती प्रक्रियाहर्बल गार्डन यांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली.विद्यार्थ्यांनी आयुर्वेदिक उपचारपद्धती, निदानशास्त्र आणि रुग्णसेवेतील भारतीय मूल्यांचा अभ्यास केला.कार्यक्रमाचे आभार श्री. धनंजय मिश्राया कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी श्री. धनंजय मिश्रा यांनी केले.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From- **SHYAMSINGH KANHAIYASINGH THAKUR** - TO **SHYAM KANHAIYASINGH THAKUR** PASSPORT NO :- **K1732860** My Residential Address is :- Krushnashray - 27 Behind Akashwani Gully No .3 Infront Of Hanuman Mandir, Shastri Nagar Akola 444001

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From- **NEHA LOKCHAND VALECHHA** - TO **NEHA LOKCHAND VALESHA** My Residential Address is - Near Jhulelal Temple Gurunanak Nagar, Sindhi Colony Malkapur 443101

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport No is :- (H7667203) ---OLD NAME--- AMIR ALI MOHSIN ALI SIDDIQUI ----NEW NAME---- AAMIR ALI MOHSIN ALI SIDDIQUI My Residential Address is :- Building No - 1710, Firdous Colony, Lakkad Ganj, Infront of Allah Masjid Akola 444001.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक :** *पुरूषोत्तम **मधुकरराव** ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर



न्यायपंडित, सर्व शास्त्रात दिग्विजयी ठरलेले, सर्व विद्यासंपन्न ,अचलवीर, आकाशातील सूर्य आणि पूर्ण चंद्राप्रमाणे सुशोभित सत्धम्म मार्गदर्शक, धम्मप्रवर्तक भारतरत्न - बोधिसत्व महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना त्यांच्या दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी असलेल्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन ॥

बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ सालातील एप्रिल मासाच्या १४ तारखेला मध्य प्रदेशातील महू (सध्याचे डॉ. आंबेडकर नगर) येथे झाला. त्यांचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ रोजी नवी दिल्ली येथे झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, थोर अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित आणि महान समाजसुधारक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विद्यार्थी जीवन आणि त्यांनी विद्यार्थ्यांना दिलेले संदेश अनमोल आहेत. त्यांचे विद्यार्थी जीवन अत्यंत संघर्षमय पण अध्ययनशील होते.? सामाजिक विषमतेचा सामना त्यांना त्यांच्या शालेय जीवनापासूनच करावा लागला. अस्पृश्यतेमुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. त्यांना वर्गातील स्पृश्य मुलांपासून भरून आणलेल्या गोणपाटावर दूर बसावे लागत असे. कधी कधी तर वर्गाच्या बाहेर बसावे लागे.

काही शिक्षक त्यांच्याशी तिरस्काराने वागत असत. शाळेत पाणी पिण्यासाठीही त्यांना शिपायाची मदत घ्यावी लागायची. त्यांच्या आत्मचरित्रात्मक नोंदीनुसार, जातीभेदांमुळे त्यांना एलफिन्स्टन शाळेतील सामान्य नळाचे पाणी पिण्याची परवानगी नव्हती. त्यांनी नमूद केले आहे की, पाणी पिण्यासाठी त्यांना शाळेतील शिपायाची वाट पाहावी लागत असे.

शिपायाने पाणी दिले तरच त्यांना ते पिण्याची परवानगी होती. त्यांनी याचा उल्लेख No Peon, No Water (शिपाई नाही, पाणी नाही) अशा शब्दांत केला आहे. पण त्यांच्यामध्ये? शिक्षणाची तळमळ होती. पुढील जीवनात आलेल्या सर्व अडचणींवर त्यांनी फक्त शिक्षणाच्या बळावर मात केली. विद्यार्थी जीवनात ते दररोज अठरा तास अभ्यास करीत असत.विद्यार्थी जीवनात त्यांचे वाचन, मनन, चिंतन, लेखन सतत सुरू असे, त्यात ते कधीही खंड पडू देत नसत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी ज्ञानाची कास धरली.

ते मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा सन १९०७ साली उत्तीर्ण झाले.ते कुटुंबातील व समाजातील पहिले महाविद्यालयीन विद्यार्थी होते. पुढे त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करावा लागला. जागतिक स्तरावर त्यांनी शिक्षण घेतले.त्यांनी भारतासह परदेशात, जसे की कोलंबिया विद्यापीठ (न्यूयॉर्क) आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे उच्च शिक्षण घेतले.

अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास अशा ६४ विषयांवर त्यांचा अभ्यास होता. त्यांनी अनेक पदव्या बौद्धिक परिश्रम,जिद्द आणि चिकाटी या गुणांमुळे मिळविल्या. आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे हे गुण आचरणात आणल्यास आजचा विद्यार्थी कोणत्याही वर्गात मागे न राहता विद्यार्थी जीवनात पूर्णपणे यशस्वी होईल. डॉ. आंबेडकरांचे विद्यार्थी जीवन आजच्या विद्यार्थ्यांसाठी एक महान प्रेरणास्त्रोत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक हेच खरे मित्र होते. त्यांना पुस्तकांबद्दल खूप प्रेम होते.पुस्तकाएवढा चांगला मित्र शोधूनही मिळणार नाही, हा त्यांचा विचार महत्वपूर्ण होता आणि त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथाशी मैत्री करण्याचा संदेश दिला.

डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना दिलेले संदेश महत्वपूर्ण आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना दिलेला सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' हा आहे. शिका म्हणजे शिक्षण घ्या . शिक्षण हा समाजाचा आत्मा आहे. शिक्षणामुळेच जीवनात प्रगतीचा मार्ग उघडतो. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो ते प्राशन करेल, तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे ते म्हणत असत.

विद्यार्थ्यांनी कठोर अभ्यास करून समाजाचे निष्ठावान नेते बनले पाहिजे तेव्हाच देशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाता येईल. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी न मिळविता, समाजाच्या उत्थानासाठीही मिळविले पाहिजे. सर्वांनी शिकले पाहिजे; कारण शिक्षणाअभावी माणूस सर्वस्व गमावतो हे लक्षात ठेवले पाहिजे,असे ते म्हणत असत

संघटित व्हा या संदेशात त्यांनी म्हटले आहे की, एकत्रित येऊन आपल्या हक्कांसाठी आणि सामाजिक बदलांसाठी लढा दिला पाहिजे.

संघर्ष करा.. या संदेशात त्यांनी म्हटले आहे की, सामाजिक न्याय आणि समानतेसाठी लढण्याची तयारी ठेवली पाहिजे.

शील (सदाचारी चारित्र्य) चे महत्त्व सांगताना त्यांनी म्हटले आहे की, शिक्षणासोबत शीलवान असणे अत्यंत आवश्यक आहे. जर शिक्षित व्यक्ती शीलवान नसेल, तर तो आपल्या बुद्धिचा उपयोग समाजाचे नुकसान करण्यासाठी करू शकतो.

शिक्षण आणि शील यांचा समन्वय अतिशय महत्त्वाचा आहे. शिक्षित व्यक्ती शीलवान असेल तर त्या व्यक्तीचा समाजाला फार मोठा फायदा होऊ शकतो. आज बाबासाहेबांनी सांगितलेल्या शीलवान व्यक्तीची समाजाला पयार्याने देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी खूप आवश्यकता आहे पण दुर्दैव.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुरोगामी विचारांचा प्रसार करण्यासाठी तसेच विविध क्षेत्रातील ज्ञान समाजापर्यंत पोहोचवून त्यांचे प्रबोधन करण्यासाठी अनेक वृत्तपत्रे सुरू केली होती.

मूकनायक : १९२० मध्ये मूकनायक या पाक्षिकाची सुरुवात केली.मूक (बोलू न

**प्रा. अरुण बाबाराव बुंदेले**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार प्राप्त
**अमरावती. ८०८७७४८६०९**

शकणाऱ्या) समाजाला आवाज देणे हे पाक्षिक प्रकाशित करण्यामागे त्यांचा मुख्य उद्देश होता. १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाची सुरुवात केली, नंतर या पक्षिकाचे साप्ताहिकात रूपांतर केले.

अस्पृश्य समाजाचे प्रश्न आणि त्यांच्यावरील अन्याय जगासमोर आणणे हा उद्देश हे पाक्षिक प्रकाशित करण्यामागे होता. १९२८ मध्ये 'समता हे पाक्षिक सुरु केले. त्यांनी स्थापन केलेल्या 'समाज समता संघा'चे मुखपत्र म्हणून सामाजिक समतेच्या विचारांचा प्रसार करणे हा उद्देश हे पाक्षिक प्रकाशित करण्यामागे होता.

१९३० मध्ये 'जनता' हे पाक्षिक प्रकाशित केले, नंतर त्याचे साप्ताहिकात रूपांतर झाले. 'जनता' या वृत्तपत्रातून त्यांनी सामाजिक व राजकीय चळवळीचे मुद्दे प्रभावीपणे मांडले. याचे ब्रीदवाक्य 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे होते.

४ फेब्रुवारी १९५६ रोजी प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकाचे प्रकाशन केले. हे वृत्तपत्र 'जनता' याच वृत्तपत्राचे नामांतर करून सुरू करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले प्रबुद्ध भारत हे नियतकालिक आता पाक्षिक म्हणून प्रकाशित होत आहे, ते आजही सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर हे प्रकाशन बंद होते. ११ एप्रिल २०१७ रोजी महात्मा फुले जयंतीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेबांचे नातू ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी हे पाक्षिक नव्या स्वरूपात पुन्हा प्रकाशित करण्यास सुरुवात केली. ॲड.प्रकाश आंबेडकर हे या पाक्षिकाचे सध्याचे संपादक आहेत.

प्रबुद्ध भारतचे संस्थापक संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मराठी भाषेतील प्रबुद्ध भारत या साप्ताहिकाचाउद्देश बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याच्या आणि 'प्रबुद्ध भारत' (प्रबुद्ध किंवा जागृत भारत) या संकल्पनेला मूर्त रूप देण्याच्या त्यांच्या चळवळीचा आणि विचारांचा प्रसार करणे हा होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रकाशित केलेली वृत्तपत्रे प्रामुख्याने मराठी भाषेत प्रकाशित झाली होती; कारण त्या काळात महाराष्ट्रातील सामान्य जनतेची ती भाषा होती. त्यामुळे त्यांच्या पुरोगामी विचारांचा प्रचार व प्रसार फार मोठ्या प्रमाणात तत्कालीन काळात झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी झालेल्या महापरिनिवार्णानंतरचा संपूर्ण प्रसंग कॅमेरामध्ये चित्रित करणारे व्यक्ती नामदेव व्हटकर हे मूळचे कोल्हापूरचे होते.

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिवार्णानंतर त्यांच्या अंत्यदर्शनाचे ऐतिहासिक महत्त्व ओळखून त्यांनी तो प्रसंग चित्रित करण्याचा निर्णय घेतला. या चित्रीकरणासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते, त्यामुळे त्यांनी आपले घर आणि छापखाना गहाण ठेवून १४०० ते १५०० रुपये जमवले. या पैशांतून त्यांनी कॅमेरा भाड्याने घेतला आणि शंकरराव सावेकर नावाच्या कॅमेरामनला सोबत घेतले.

६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे पार्थिव घेऊन जाणाऱ्या ट्रकवर एका कोपऱ्यात उभे राहून त्यांनी दादर येथील राजगृहासमोरून ते चैत्यभूमीपर्यंतच्या अंत्यदर्शनाच्या मिरवणुकीचे आणि अंत्यसंस्काराचे चित्रीकरण केले. त्यांनी सुमारे २८०० फूट फिल्मचे शूटिंग केले.

हा माहितीपट तयार करण्यात नामदेव व्हटकर यांचा अत्यंत महत्त्वाचा आणि निःस्वार्थ त्याग होता, ज्यामुळे आज आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणांचे दृश्य स्वरूपात दर्शन घडते. या फुटेजला 'महापरिनिर्वाण' नावानेही ओळखले जाते.नामदेव व्हटकर हे एक पडद्यामागील हिरो ठरले, ज्यांच्या प्रयत्नांमुळे डॉ. आंबेडकरांच्या अंतिम यात्रेची दृश्ये इतिहासात कायमस्वरूपी जतन झाली आहेत.

दि . १ एप्रिल १९३५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. या भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरीजीन अँड इट्स सोल्युशन' या पुस्तकातून रिझर्व्ह बँकेच्या रचना आणि दृष्टिकोनासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन घेण्यात आले होते.

भारतीय रिझर्व बँकेच्या (फ्इक) स्थापनेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खूप मोठा वाटा आहे, असे म्हणण्यामागे अनेक महत्त्वाची कारणे आहेत. डॉ. आंबेडकरांनी 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपीः इट्स ओरीजीन अँड इट्स सोल्युशन' हा महत्त्वाचा प्रबंध लिहिला होता. या प्रबंधामध्ये त्यांनी भारतातील चलन पद्धती, विनिमय दर आणि आर्थिक समस्यांवर सखोल विश्लेषण केले होते.

याच प्रबंधात त्यांनी भारतासाठी एका केंद्रीय बँकेची म्हणजेच रिझर्व बँकेची आवश्यकता आणि कार्यपद्धती स्पष्ट केली होती. १९२६ मध्ये भारतात आर्थिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आणि चलन व वित्तव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी अँड फायनान्स (ज्याला हिल्टन यंग कमिशन असेही म्हणतात) नेमण्यात आले होते.

डॉ. आंबेडकरांना या कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी बोलावले होते. विशेष म्हणजे, या कमिशनमधील सदस्यांनी डॉ. आंबेडकरांच्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' या पुस्तकाचा आधार घेऊन चर्चा केली आणि त्यांच्या विचारांवर आधारित प्रश्न विचारले. बाबासाहेबांनी कमिशनसमोर स्वतंत्र रिझर्व्ह बँकेची गरज आणि तिची कार्यप्रणाली अत्यंत तर्कशुद्ध व विश्लेषणात्मक पद्धतीने मांडली.

RBI च्या संकल्पनेचा आणि रचनेचा पाया १९३५ मध्ये ज्या भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ नुसार RBI ची स्थापना झाली, त्या कायद्यातील अनेक तरतुदी आणि बँकेची रचना व दृष्टिकोन हे प्रामुख्याने हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींवर आधारित होते आणि आयोगाने ज्या शिफारशी केल्या, त्याचा मुख्य आधार डॉ. आंबेडकरांच्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथातील मूलभूत संकल्पना होत्या.

बाबासाहेबांनी या पुस्तकात देशाच्या आर्थिक स्थिरतेसाठी चलन निर्मितीचे नियंत्रण आणि पतधोरण सांभाळणारी एक स्वायत्त मध्यवर्ती बँक असावी,अशी दूरदृष्टीची संकल्पना मांडली, जी आजही फ्इक च्या कामकाजाचा आधार आहे. सारांश,डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेतज्ज्ञ आणि समाजसुधारकच नव्हते तर ते जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ होते आणि त्यांच्या सखोल आर्थिक विचारांमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेची संकल्पना आणि रूपरेषा निश्चित झाली. त्यामुळेच RBI च्या स्थापनेत त्यांचा वाटा खूप महत्त्वाचा आहे असे मानले जाते. अशा या भारतरत्न - बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन॥

# जग बदलणारा महामानव!

देशातील गोरगरीब, वंचित, पिडीत, शोषित व दलित समाजातील शूद्र व अतिशूद्र प्रवगार्तील लोकांना न्याय, समता बंधुता आणि मानवता मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले पूर्ण आयुष्य बहुजन जनतेच्या कल्याणासाठी व भल्यासाठी अर्पण केले आहे. रक्ताचा एकही थेंब न सांडता केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर या देशात रक्त विरहित सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजनैतिक क्रांती करून दाखवली आहे.

बाबासाहेबांना वर्गात बसून शिकायला बंदी होती. त्यांना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागले होते. तरीसुद्धा बाबासाहेब वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत होते. घरी लाईट नसल्यामुळे संध्याकाळी रोडच्या दिव्याखाली अभ्यास करून बाबासाहेबांनी उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर केला. बाबासाहेबांना त्यांची पत्नी रमाई आंबेडकर यांनी व सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेब खूप खूप शिकावे म्हणून त्यांना वेळेवर आर्थिक मदत केली.

बाबासाहेबांच्या बालपणी बाबासाहेबांना जातीयतेचे विखारी चटके पदोपदी सहन करावे लागले होते. महार जातीचा असल्यामुळे त्यांना उच्चभ्रू समाजातील लोक जवळ बसू देत नव्हते, त्यांना बाबासाहेबांच्या सावलीचा ही विटाळ व्हायचा. कुठे गाडीने जायचे म्हटले तर गाडीवान त्यांना गाडीत बसू देत नव्हता. शाळेतील शिक्षक बाबासाहेबांना जवळ येऊ देत नव्हते.

त्यांचा गृहपाठ लांबूनच पहायचे. वगार्तील मुले बाबासाहेबांना महार जातीचा असल्यामुळे बाबासाहेबांची थट्टा करायचे व बाबासाहेबांपासून चार हात लांब राहायचे. तरीही बाबासाहेब त्यांच्याकडे दुर्लक्ष करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करायचे आणि खूप खूप अभ्यास करायचे. अठरा अठरा तास अभ्यास व चिंतन करून बाबासाहेबांनी या जगात कोणीही शिक्षण घेतले नाही तेवढे शिक्षण शिकून आणि अमाप पदव्या संपादन करून या देशातील तळागाळातील रंजल्या गांजलेल्या बहुजन समाजाला व गरिबीत खितपत पडलेल्या दुःखी, पिडीत, शोषित, वंचित व मागासवर्गीय समाजाला भारतीय संविधान लिहून त्यांच्या न्याय हक्काची एकेक कलम घटनेच्या पानापानांत लिहून ठेवली.

डॉ. बाबासाहेबांना आणि शूद्र व अतिशूद्रांना महार जातीचा असल्यामुळे शिकायला बंदी होती, परंतु बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून बहुजन समाजाला समता, बंधुता व मानवता प्राप्त करून दिली. बहुजन समाजातील शूद्रांना, दलितांना व मागासवर्गीयांना गळ्यात मडके आणि पाटीला झाडू असायचा परंतु बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समतेचे बीज पेरले आणि देशात समता व मानवता चांगल्या प्रकारे रुजली. बाबासाहेबांनी गळ्यातील मडके काढले आणि पाठीचा झाडू काढून गळ्यात टाय आणि कंबरेला कंबर पट्टा दिला.

ज्या मनुस्मृतीमुळे बहुजन समाजाला कुत्र्या मांजरापेक्षाही पलीकडचे जीवन म्हणजेच जनावरासारखे हिन दजार्चे जीने जगावे लागायचे परंतु बाबासाहेबांनी मनुस्मृतीला जाळून जगात सर्वोत्तम अशा भारतीय संविधानाची निर्मिती करून सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान अधिकार देऊन देशात समता, मानवता व बंधुता रुजवण्याचे काम केले आहे.

हिंदू स्त्रियांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी लिहिलेले हिंदू कोड बिल संसदेत नामंजूर होतात स्वतःच्या कायदेमंत्री पदाला लाथ मारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एकमेव व्यक्ती होते. दिवाळी बोनस, गरोदरपणात स्त्रियांना घरी बसून पगार, कामगारांना बारा तासावरून आठ तास करणारे एकमेव कामगारांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत.



Bodhisattva Babasaheb Dr. B.R. Ambedkar

गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल असे बाबासाहेब नेहमी म्हणायचे. बाबासाहेबांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा लाखमोलाचा संदेश इथल्या बहुजन समाजाला देऊन बहुजन समाजाला जागृत करण्याचे काम केले आहे. बाबासाहेब म्हणायचे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे बाबासाहेब इथल्या गोरगरीब, वंचित, शोषित, पीडित घटकातील लोकांना सातत्याने म्हणायचे.

भारतीय संविधान लिहिण्याअगोदर देशात हुकूमशाहीचा बोलबाला होता. देशाचा राज्यकारभार मनुस्मृतीनुसार चालवला जायचा. मनुस्मृती इथल्या बहुजन समाजाला खूप हिन व नीच दर्जाची वागणूक देत होते. माणसे असूनही त्यांना माणसासारखे वागता व जगता येत नव्हते. मागासवर्गीयांचे हक्क व अधिकार नाकारलेल्या मनुस्मृतीला डॉ. बाबासाहेबांनी रायगडाच्या पायथ्याशी जाळून छत्रपती शिवरायांच्या अपमानाचा बदला घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर किती जणांना कळाले? हा मोठा प्रश्न आहे.



**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, जि. लातूर.**
**7498715661**

महात्मा गांधी म्हणायचे की मतदानाचा अधिकार जी माणसे इन्कम टॅक्स भरतात किंवा जी माणसे उच्च शिक्षित आहेत, अशाच माणसांना मतदानाचा अधिकार द्यायचा. परंतु त्या काळात आमच्या बहुजन समाजातील महार, मांग, ढोर, चांभार या प्रवर्गातील लोकांना शिक्षणाचा जराही गंध नव्हता आणि कोणताच व्यक्ती इन्कम टॅक्स भरत नव्हता कारण त्याकाळी बहुजन समाजातील मागासवर्गीय दलित समाज एवढा श्रीमंत नव्हताच.

म्हणून गांधीजी जाणीवपूर्वक म्हटले की, मतदानाचा अधिकार हा श्रीमंतांना व उच्च शिक्षित लोकांनाच द्यावा.. तेव्हाचे उच्चशिक्षित लोक म्हणजे ब्राह्मण होते. परंतु बाबासाहेबांनी भारतीय संविधान लिहिताना हे सर्व नाकारले आणि जो व्यक्ती १८ वर्षाचा झाला आहे, त्याच व्यक्तीला मतदानाचा प्रौढ अधिकार देऊन त्यांचा सन्मान वाढवला आहे. मग तो गरीब असो की श्रीमंत, झोपडीत राहणार असो की महालात,

प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार देऊन या देशातील मनुवादी व्यवस्था नाकारून लोकशाही व्यवस्था प्रस्थापित केली. हे बाबासाहेबांनी इथल्या गोरगरीब, वंचित, पिडीत, शोषित घटकातील लोकांसाठी फार मोठे काम केले आहे. त्यांच्या कार्याला जगात तोड नाही.

बाबासाहेबांएवढ्या पदव्या या जगात घेणारा दुसरा कोणी मायचा लाल अजून तरी जन्माला आला नाही. बाबासाहेबांएवढे उच्च शिक्षण या जगात कोणीच घेतले नाही. बाबासाहेबांएवढा बुद्धिवान प्राणी या पृथ्वीतलावर अजूनही अस्तित्वात आला नाही. बाबासाहेबांना जग बदलणारा बाप माणूस आदराने म्हटले जाते. तसेच आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते हे सुद्धा बाबासाहेबांना म्हटले जाते.

या जग बदलणाऱ्या बाप माणसाला व त्यांच्या अलौकिक कार्याला कोटी कोटी वंदन. या जग बदलणाऱ्या महामानवाचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ ला दिल्ली येथे झाले. शेवटपर्यंत तळागाळातील गोरगरीब जनतेच्या भल्यासाठी दिव्या सम जळणारा दिवा कायमचा शांत झाला. दलितांना आधार देणारा आधारस्तंभ कायमचा काळाच्या पडद्याआड गेला.

गोरगरीब सर्वसामान्य जनतेला सावली देणारा वटवृक्ष कायमचा उन्मळून पडला. बाबासाहेब केवळ दलितांपुरतेच मर्यादित नव्हते तर त्यांनी समस्त भारतीयांसाठी भारतीय संविधान लिहून प्रत्येक जाती धर्माच्या लोकांना मूलभूत हक्क व अधिकार देऊन त्यांना सक्षम बनवण्याचे काम केले आहे.

दुसऱ्या दिवशी ७ डिसेंबरला चैत्यभूमी येथे त्यांच्यावर बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबासाहेबांच्या अंत्यविधीला देशातून लाखो लोक मुंबईला चैत्यभूमी येथे पायी चालत आले होते. भलेही त्यांना बाबासाहेबांची अंत्यविधी सापडली नाही पण बाबासाहेबांची राख सावडायला व त्यांची राख माथी लावायला देशातील महासागर उसळला होता.

सगळा देश हळहळ व्यक्त करत होता. धाय मोकलून रडत होता. काहीजण बाबासाहेबांच्या अस्थि घेऊन जाण्यासाठी खूप प्रयत्न करत होते. जिथे जिथे बाबासाहेबांच्या अस्थि पोहोचल्या त्या गावात आजही बाबासाहेबांना वंदन करण्यासाठी ६ डिसेंबर रोजी भीमसागर उसळतो.

बाबासाहेबांनी समस्त भारतीयांवर कधीही न फिटणारे महान असे उपकार करून ठेवले आहेत. बाबासाहेबांना मरून जवळपास ६९ वर्षे होत आहेत. तरीसुद्धा बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव जगात केला जात आहे.

अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात शिकून गेलेल्या हजारो विद्यार्थ्यांपैकी सर्वात ज्ञानी व बुद्धिवान विद्यार्थी कोण? असा अहवाल प्रसिद्ध केला होता. तर त्या अहवालात जगातील सर्वात बुद्धिवान व हुशार विद्यार्थी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आघाडीवर आहे.

संपूर्ण जग बाबासाहेबांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखते. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना कोटी कोटी वंदन...आणि साष्टांग दंडवत...शेवटी जाता जाता एवढेच म्हणावेसे वाटते की,

*उजाड राणी किमया केलीस मोठी...*
*भीमा तुझा प्रणाम कोटी कोटी....*

# : डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती.

जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माज्या संघषार्चे यश आहे.

त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने अस्पृश्य, अयोग्य म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**९९६०१०३५८२**
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक जात मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात हम पानी लेंगे, हक्क से लेंगे! असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली.

नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली.

त्यांच्या सामाजिक कायार्चा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही.

भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे. यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला.

हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने बौद्धयुग दिले.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.. हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निमार्ता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत.

आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कायार्चे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे.

त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.

अशा या ज्ञानाच्या प्रतीकाला विनम्र अभिवादन.....

